(133)

क्र. अराप १०९४/२९९/प्रक्र ६३/१५/१३,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २८ जुलै, १९९४.

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद लातूर

4 AUG 1994

विषय :- महिला आरोग्य अभ्यागताचे प्रशिक्षण घेतलेल्या सहाय्यकारी परिचारीका प्रसाविकांना परिचारीका प्रसाविकांच्या पदावर पदोन्नती देण्याबाबत.

संदर्भ :- पत्र क्रमांक जिपला/आवि/आस्था २/३८/९४, दिनांक ५/१/९४ व क्र. जिपला/आवि/आस्था २/८६८/९४ दिनांक ५/४/९४

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय क्र. एनयूआर १०९०/२७५/प्रक्र ४८/९०/सेवा-७ दिनांक २१/९/९३ अनुसार परिचारीका प्रसाविका हा सुप्त संवर्ग समजण्यात आला आहे. परिचारीका प्रसाविकांची सध्या रिक्त असलेली व यापुढे रिक्त होणारी पदे आरोग्य सहाय्यक [महिला] या पदनामाने भरावयाची आहेत. सहाय्यकारी परिचारीका प्रसाविकांना आरोग्य सेवक [महिला] व महिला आरोग्य अभ्यागतांना आरोग्य सहाय्यक [महिला] ही पदे सहाय्यकारी परिचारीका प्रसाविका या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार आणि आरोग्य सहाय्यक [महिला] ही पदे महिला आरोग्य अभ्यागता या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार भरावयाची आहेत.

परिचारीका प्रसाविका हा सुप्त संवर्ग समजण्यात आला असल्यामुळे परिचारीका प्रसाविकांची सध्या रिक्त असलेली पदे महिला आरोग्य अभ्यागतांचे सहा महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या आरोग्य सेवक [महिला] [पूर्वीचे पदनाम सहाय्यकारी परिचारीका प्रसाविका] यांच्यामधून पदोन्नतीने व आरोग्य सहाय्यक [महिला] या नव्या पदनामाने भरण्यात यावीत त्यामुळे परिचारीका प्रसाविकांची सध्या रिक्त असलेली पदे परिचारीका प्रसाविका या पदनामाने भरण्याचा प्रश्न उदभावत नाही.

महिला आरोग्य अभ्यागता या पदाचे केवळ आरोग्य सहाय्यक [महिला] असे पदनाम बदलण्यात आले आहे. आणि परिचारीका प्रसाविकांची रिक्त पदे आरोग्य सहाय्यक [महिला] या संवर्गात घेण्यात आली आहेत त्यामुळे आरोग्य सहाय्यक [महिला] या पदासाठी स्वतंत्र ५० बिंदू नामावली ठेवण्याची आवश्यकता नाही तर महिला आरोग्य अभ्यागता या पदासाठी ठेवण्यात आलेली ५० बिंदू नामावली आरोग्य सहाय्यक [महिला] या नव्या पदनामाने पदे भरताना पुढे चालू ठेवण्यात यावीत.

हे पत्र सार्वजनिक आरोग्य विभाग व सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

[ वि. गो. चावुकस्वार ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

Scanned with OKEN Scanner

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित –

१] सर्व विभागीय आयुक्त,

२] सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद [लातूर वगळून]

३] संचालक आरोग्य सेवा मुंबई,

४] सदस्य सचिव महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळ मुंबई,

५] सर्व सदस्य सचिव प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळे

६] कक्ष अधिकारी सार्वजनिक आरोग्य विभाग[सेवा ६] मंत्रालय, मुंबई ३२
[त्यांचे अनौपचारीक संदर्भ क्रमांक ३०१/सेवा ६ दिनांक ४/३/९४]

७] अवर सचिव सामान्य प्रशासन विभाग [१६–ब] मंत्रालय, मुंबई ३२
[त्यांचे अनौपचारीक संदर्भ क्रमांक अनौसं २३४/१६–ब दिनांक ५/५/९४]

८] कार्यासन क्र. १२, १३, १४, १६, १७, १८ व २० ग्राम विकास व जल संधारण विभाग
मंत्रालय, मुंबई ३२.

आरोग्यस्वामी